दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार दि.१७ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -०१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## महाविकास आघाडीच गुजरातची ब्रँड म्बेसेडर

# ज्यांचा गृहमंत्रीच तुरुंगात गेला, तेच आता आरोप करताहेत-देवेंद्र फडणवीसांचा पलटवार



**मुंबई (वृत्तसंस्था)**
राज्यातील महाविकास आघाडीतील नेते गुजरात राज्याचे ब्रँड म्बेसेडर असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. सध्या देशात महाराष्ट्र नंबर एकचे राज्य असून देखील महाविकास आघाडीचे नेते गुजरातचे गुणगान गात आहेत. या माध्यमातून ते महाराष्ट्राला कमी लेखत असल्याचा आरोप त्यांनी केला. इतकेच नाही तर गृहमंत्रालयावर होत असलेल्या आरोपांवर देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांचा गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेला, तेच आता आरोप करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.
राज्यातील स्थगिती सरकार गेल्यानंतर आता राज्यात गतिशील सरकार आले असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. आमच्यासाठी निवडणुकीचा शंखानाद झाला आहे. मात्र विरोधकांसाठी ते ऐलान असल्याचा टोला देखील फडणवीस यांनी लगावला आहे. आम्ही परिवर्तन करणाऱ्या योजना आणल्या असल्याचा दावा देखील फडणवीस यांनी केला आहे.
शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेची योजना आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसा वीज उपलब्ध करून देणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. ही केवळ घोषणा नाही. तर याचे प्रत्यक्ष काम जमिनीवर सुरू केले असल्याचे देखील ते म्हणाले. साडेआठ रुपयांना पडणारी वीज आता तीन रुपयाला पडणार असल्याचे देखील फडणवीस यांनी म्हटले आहे. यातून राज्य सरकारचा मोठ्या प्रमाणात पैसा देखील वाचणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.
राज्यातील कायदा व्यवस्थे संदर्भात देखील गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राज्य सरकारने कोणतेही घटना घडल्यानंतर तात्काळ कारवाई केली असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. मात्र, ज्यांचे गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेले. ते आता राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलत असल्याचा खोचक टोला देखील त्यांनी लगावला. यावेळी त्यांनी राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या म्हणजेच उद्धव ठाकरे सरकारच्या काळात घडलेल्या अनेक गुन्हेगारी संदर्भातील घटनांचा उल्लेख केला. आता देखील काही घटना घडल्या आहेत. मात्र तात्काळ कारवाई केली गेली असल्याचा दावा त्यांनी केला.

# बीडच्या खासदारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

## ट्रेनी शिक्षकांचा कालावधी वाढविण्याची केली मागणी

**बीड | प्रतिनिधी**
शासनाने 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंर्गत ट्रेनी शिक्षक पदभरती केलेली आहे.त्याचा कालावधी सहा महिन्यांचा आहे.परंतू या कालावधीत शैक्षणिक वर्ष पूर्ण होत नाही. त्यामुळे वाढीव कालावधी देवून निवड झालेल्या ट्रेनी शिक्षकांना दिलासा द्यावा.अशा मागणीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.
राज्य शासनाकडून 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यान्वित आहे. त्या योजनेच्या माध्यमातून राज्यातील जिल्हा परिषद शाळेत ट्रेनी शिक्षकांची पदभरती करण्यात आली आहे.मात्र शैक्षणिक वर्ष पाहता, सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होत नाही.त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी वाढविणे आवश्यक आहे.असे निवेदन प्रशिक्षणार्थींनी माझ्याकडे दिले आहे.त्या निवेदनातून त्यांनी विनंती केली आहे की, खासदार या नात्याने आमची मागणी राज्य सरकारकडे कळवावी आणि ट्रेनी शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा.
बीडसह राज्यातील ट्रेनी शिक्षकांचा हा प्रश्न लक्षात घेता, त्यांची मागणी योग्य आणि रास्त आहे.त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी पूर्ण होण्यासाठी संबंधित विभागास आदेशीत करावे.असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

> **“ बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळावे, त्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री'युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्यात सुरु केली.परंतु सदरील योजना राबवित असतांना ती पूर्णपणे यशस्वी होते का? हे पाहणे महत्वाचे आहे. मात्र प्रशिक्षणार्थी यांच्या निवेदनातून स्पष्ट होते की, या योजनेचा कालावधी शैक्षणिक वर्षात पूर्ण होत नाही. ही बाब लक्षात घेवून खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून कालावधी वाढविण्याची मागणी केली.त्यामुळे ट्रेनी शिक्षकांना दिलासा मिळणार आहे.**

## क्रांतिकारी शिक्षक संघटनेचच्या कार्यालयाचे जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न



**बीड | प्रतिनिधी**
बीड शहरातील बशीरगंज चौकात क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले.
संघटने चे नेते शहीद कादरी यांनी संघटने बाबत माहिती दिली . यावेळी मार्गदर्शक शहाफिज साहेब, नरसिंग नायकवाडे, शशिकांत गायकवाड, आसरार खान, अजीज मुफ्ती ,मजहर सर ,तोफिक, फजल, जावेद, आंबेद,रजाक , इमरान काबळे,शिनगारे,पवार, मुळे युनूस परवेज तसेच पदधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आने वाले हर बडे तुफान के संकेत पहले परिंदो को ही मिलते है. माहोल तो बेशक तुफान से ही बदलने वाला है.....

### बीड शहर बचाव मंचाचे नितीन जायभाये यांचे प्रस्थापितांना सडेतोड उत्तर

**बीड | प्रतिनिधी**
क्षीरसागर घराण्याने कायम मुस्लिम समाजाचा विश्वासघातच केला आहे. क्षीरसागर घराणे कायम मुस्लिम समाजाच्या हक्कांच्या बोकांडीच बसत आलेले आहे. व मुस्लिम समाजाचा जीवच घेत आलेले आहे. याचे इतिहासात अनेक पुरावे आहेत. मुस्लिम समाजाला कायम ताटाखालचे पाळलेले मांजर बनवून ठेवण्याचा प्रयत्न क्षीरसागर घराण्यातील लोकांनी आजवर केला आहे. मुस्लिम समाज वंचित आहे, शोषित आहे, मजबूर आहे, गरीबीत आहे. कोणी केलं आहे आजवर या मुस्लिम समाजाचे शोषण ? का गरीब आहे मुस्लिम समाज ? का वाईट आणि दयनीय परिस्थिती आहे मुस्लिम मोहल्यांची ? का पसरलेली



आहे मुस्लिम समाजामध्ये प्रचंड बेरोजगारी ? कोणी केलं आजवर मुस्लिम समाजाच नेतृत्व ? आजवर कोणावर विश्वास ठेवत आलेला होता मुस्लिम समाज ? काय केलं तुम्ही गेल्या ४० वर्षात या मुस्लिम समाजासाठी. ? १९९९-२००० च्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नव्याने उदयाला आलेल्या राष्ट्रवादी पक्षाचे निवडून आलेले एकमेव मुस्लिम आमदार सय्यद सलीम यांना पहिल्या यादीतच कॅबिनेट मिनिस्टर पद मिळाले होते. परंतु क्षीरसागरांच्या राज्यमंत्रीपदाच्या मोबदल्यात आमदार सय्यद सलीम यांनी त्या पदावर पाणी सोडले. त्या काळात क्षीरसागरांची बीडमध्ये निवडणूक लढवायची हिम्मतही नव्हती. म्हणून आमदार सय्यद सलीम यांना निवडणूक लढवावी लागली आणि त्यांनी ती जिंकूनही दाखवली. परंतु क्षीरसागरांनी त्यांचे कॅबिनेट मंत्रीपद हिरावून घेतले. पण सय्यद सलीम यांनी इमान आणि निष्ठेचे मोठे उदाहरण साकारून दाखवले. क्षीरसागर कुटुंब नेहमी मुस्लिम समाजाच्या हक्कांच्या बोकांडीच बसत आलेले आहे. मुस्लिम समाजाला कधीही नेतृत्व करण्याची संधी त्यांनी दिली नाही हेच सत्य आहे. आणि हीच त्यांची बरबटलेली कारकीर्द आहे.

## कै.निलेश म्हात्रे याच्या अपघाताच्या निषेधार्थ नवी मुंबई महानगर पालिकेसमोर आंदोलन

### पनवेल संघर्ष समितीचा पुढाकार;कै.निलेश म्हात्रे याला न्याय देण्याची कुटुंबियांची प्रशासनाकडे मागणी

**उरण | विठ्ठल ममताबादे**
दि.०८ फेब्रुवारी २०२४ रोजी उरण तालुक्यातील खोपटे येथे एन.एम.एम.टी. प्रवासी बस चालकाच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या भीषण अपघातात निलेश शशिकांत म्हात्रे (वय ३७ वर्षे,राहणार खोपटे ) यांचा निःष्पाप प्राण गेला व केशव ठाकूर( खोपटे) हे गंभीररित्या जखमी झाले. त्यानंतर नवी मुंबई महानगर परिवहन मंडळ यांनी २० दिवसांच्या आत मयत व जखमी यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याचे हमीपत्र लिहून दिले होते. मात्र आठ



महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही कुठल्याही प्रकारची नुकसान भरपाई मुंबई महानगर परिवहन मंडळ व नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन यांच्याकडून झालेली नाही. तरी याच्या निषेधार्त पनवेल संघर्ष समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांच्या नेतृत्वाखाली बुधवार दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी नवी मुंबई महानगर पालिका सी. बी. डी. बेलापूर येथे सकाळी १०:०० वाजता शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी या आंदोलनात आपली बहुमूल्य उपस्थिती दाखवून मयत निलेश म्हात्रे यांच्या कुटुंबियाना न्याय मिळवून देवूया असे आवाहन मयत कै. निलेश म्हात्रे यांच्या कुटुंबियांनी जनतेला केले आहे. मयत कै. निलेश म्हात्रे यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देणारच असा निर्धार पनवेल संघर्ष समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी केला आहे.न्याय मिळण्यास विलंब होत असल्याने पनवेल संघर्ष समितीने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

# विद्यार्थ्यांनी आवडीच्या झेप घ्यावी-डॉ हनुमंत सौदागर

## विभागीय कुस्ती स्पर्धेत विजयी आरती भांडवलकरचा सत्कार

**केज | प्रतिनिधी**
तालुक्यातील सोनीजवळा येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी आरती सुनील भांडवलकर हिने कुस्ती स्पर्धेत विभागीय स्तरावर विजय मिळवला व राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी ती पात्र झाली आहे. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद विद्यालय व युनिक फाउंडेशन च्यावतीने सन्मान चिन्ह सन्मानपत्र आणि रोख पारितोषिक देऊन डॉ हनुमंत सौदागर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष रतन भांडवलकर, प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर, सचिव शंकर पाखरे, संस्थेचे उपाध्यक्ष शंकरराव ससाने,मुख्याध्यापक



मंगेश गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ सौदागर म्हणाले विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रामध्ये जिद्दीने प्रयत्न करावेत यश नक्की मिळते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे शिक्षक आणि पालकांनी त्यांना भक्कम साथ दिली पाहिजे. कुस्ती स्पर्धेत जिल्हास्तरावर विजयी झालेल्या पूजा भांडवलकर चा आहे सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व सहशिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पहिल्या विद्यार्थ्याने घेतला प्रवेश



**जालना | असलम कुरेशी**
नुकतेच उद्घाटन झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास यावर्षी शंभर विद्यार्थी प्रवेश क्षमतेची अधिकृत परवानगी प्राप्त झाली आहे. आज या महाविद्यालयाच्या वैद्यकीय शिक्षण विभागात पहिल्या विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्याने जालना जिल्ह्याच्या वैद्यकीय शिक्षणात मोलाची भर पडली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. सुधीर चौधरी यांनी यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक ध्येयधोरणांबद्दल चर्चा केली. त्यांनी सांगितले की, या महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे जालना जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता वाढेल. तसेच समाजातील विविध स्तरातील विद्यार्थ्यांना उत्तम वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध होईल. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे यश हे केवळ महाविद्यालयाच्या प्राध्यापकवर्गाचेच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमांचेही फलित आहे. यापुढेही महाविद्यालय आरोग्य सेवेतील उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी कटिबद्ध राहील.याप्रसंगी महाविद्यालयाच्या विविध विभागातील प्रमुख अधिकारी व प्राध्यापक उपस्थित होते. विद्यार्थी व पालकांनी यावेळी महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाबद्दल समाधान व्यक्त केल्याचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना अधिष्ठाता डॉ. सुधीर चौधरी यांनी कळविले आहे.

दैनिक किर्णोदय चा अंक Whatsapp वर पाहण्यासाठी आपला Whatsapp नंबर व नाव ९६३७७७००४२ या क्रमांकावर SMS करा

# तलवाड्यात बदामराव पंडितांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली तलवाडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातून तीन वेळेस आमदार राहिलेले माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून यावेळी विधानसभेची निवडणूक लढविणार आहेत. विधानसभा निवडणूक जाहीर होण्याअगोदरच बदामराव पंडित यांनी गेवराई मतदार संघात भेटीगाठीचा आपला एक दौरा पूर्ण केला आहे या दौऱ्या दरम्यान अनेक गावातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या असंख्य पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेनेमध्ये होणारी ही इनकमिंग सुरूच असून दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी तलवाडा येथील सुनील डोंगरे, महेमूद भाई, जितेंद्र आठवले, शेख नवीद, शेख रियान, श्रावण आठवले, शेख रज्जाक, भाऊसाहेब जगताप, शेख इमरान, आसाराम जाधव, आकाश आठवले आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेना बीड जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी सर्वांचे गळ्यात भगवे रुमाल घालून स्वागत केले. बदामराव पंडित यांना आमदार करण्यासाठी आम्ही दिवसरात्र गावोगाव जाऊन, मतदारांच्या भेटी घेऊन जास्तीत जास्त मतदान शिवसेना आणि महाविकास आघाडीला करून घेण्यासाठी काम करणार असल्याचे शिवसेना प्रवेश केलेल्या या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी शिवसैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.



# श्री कालंदेश्वर महादेव मंदिर भू माफीयांच्या तावडीतून मुक्त–मनसेच्या लढ्याला यश

## महसूल जिल्हाधिकाऱ्यांनी वर्ग २ ची जागा १ करण्याचे आदेश केले रद्द–वर्षा जगदाळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील फुलाई नगर भागात सुमारे पाचशे वर्षापूर्वीचे काळा पाषाण मधील श्री कालदेश्वर महादेव मंदिर परिसरातील जागा हडपण्याचा डाव काही भूमाफीयांनी रचला होता. मंदिराला ठराविक जागेत बंदिस्त करत राहिलेल्या जागेवर व्यावसायिक इमारत बांधकाम करण्याचा डाव महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या लढ्यामुळे अखेर संपुष्टात आला आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी महसूल यांनी वर्ग दोन ची जागा एक मध्ये वर्गीकरण करण्याच्या आदेशाला जिल्हाधिकारी यांनी रद्दबदल ठरवलं आहे. मागील वर्षापासून बीड जिल्हाधिकारी ,मुख्याधिकारी नगरपरिषद, छत्रपती संभाजी नगर येथील पुरातन विभागाला कालिंदेश्वर मंदिराबाबत निवेदने व आंदोलन करण्याची इशारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी दिले होते. छत्रपती संभाजी नगर येथील पुरातन विभागाची एक टीम या मंदिराचे सर्वे करून गेली होती. जिल्हाधिकाऱ्यांना येथील अवैध बांधकाम थांबवण्याबाबत वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली होती याची दखल जिल्हाधिकारी यांनी घेत भुमाफियांच्या तावडीतून श्री कालिंदेश्वर महादेव मंदिर मुक्त केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या लढ्याला अखेर यश मिळाले असल्याचे मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी म्हटले आहे.



फुलेनगर भागातील नदीपात्रात सुमारे पाचशे वर्षांपूर्वीचे श्री कालंदेश्वर महादेव मंदिर सापडले होते. येथील जमीन सपाट करत येथे व्यवसायिक बांधकाम करण्याचा विडा शहरातील काही प्रतिष्ठित भुमाफियांनी उचलला होता. मंदिर परिसरातील जमिनीवर आपला हक्क सांगत येथे बांधकाम करण्यास सुरुवातही झाली होती .याची दखल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने घेतली. मंदिर परिसराची पाहणी केली असता येथे अवैद्यपणे मंदिर परिसरात संरक्षण भिंत व शिखराचे बांधकाम कोणाचेही परवानगी न घेता करण्यात येत होते सदरील बांधकाम महाराष्ट्र निर्माण सेनेने आंदोलन करून बंद पाडले होते .तसेच नगरपालिका मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी यांना यासंदर्भात तक्रार अर्ज करण्यात आला होता. छत्रपती संभाजीनगर येथे पुरातन विभागाला याची माहिती देऊन मंदिराचे सर्वेक्षण करण्याची मागणी करण्यात आली होती. जिल्हाधिकारी यांनी या सर्व प्रकरणाची तपासणी करत तत्कालीन जिल्हाधिकारी महसूल यांनी वर्ग दोन मधून एक मध्ये वर्गीकृत केलेली जमीन रद्द करत भूमाफियांना दणका दिला आहे. मंदिर बचाव आंदोलना मुळे या भूमाफियांना दणका बसला असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अखंडपणे चालवलेल्या आंदोलनाला अखेर यश मिळाले असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे.

# हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या विभागीय अध्यक्ष पदी मो.तारिक शेख

**जालना । असलम कुरेशी**

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी नागपूरचे दैनिक नागपूर पोस्टचे प्रतिनिधी मोहम्मद तारिक शेख यांची विदर्भ विभागीय अध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे.





मो. तारिक शेख यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहै की हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनमध्ये पत्रकारांना जोडून पत्रकार हिताचे रक्षण करावे तसेच अन्यायाविरोधात आवाज उठविण्यासाठी प्रयत्न करावे.

मोहम्मद तारिक शेख यांनी सांगितले की हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशन पत्रकारांची एकता व अखंडतेसाठी प्रयत्न करणार आहे.

मोहम्मद तारिक शेख यांच्या नियुक्तीबद्दल प्रदेश कार्याध्यक्ष आयेशा खान मुलानी, प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, शेख नबी सिपोराकर, शामका चव्हाण, शेख शकील (जळगांव), जावेद पठाण (भोकरदन), रहिम खान (औरंगाबाद), रियाज़ शेख, सय्यद जावेद, शहेज़ाद भाई, इरफान भाई, कबिर भाई, ज़ैद भाई, शुजाअत भाई, जिशान भाई आदी पत्रकारांनी त्यांचे अभिनंदन केले.

# काशी विश्वनाथ यात्रा पूर्ण करून सुख रूप घरी पोहोचलेल्या भाविकांचे स्वागत

## सामाजिक कार्यकर्ते अंकुशराव पाटील जाधव व माधव धुमाळे यांच्यावतीने स्वागत



**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील मुस्तापूर येथील ६० भाविक तीर्थयात्रा म्हणून श्रीक्षेत्र काशी विश्वनाथ दर्शनासाठी राजेश पवार यांच्या वतीने ट्रीप आत्ता ११ ऑक्टोबर रोजी काढण्यात आला होता व त्यात गावातील सामाजिक कार्यकर्ते अंकुश पाटील जाधव व माधव धुमाळ यांच्या सहकार्याने भाविक काशी येथील विश्वनाथाच्या दर्शनासाठी दिले होते व ते सुखरूप परत आपल्या गावी पोहोचले असता हनुमान मंदिर परिसरात सर्व भाविकांना पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन अंकुश पाटील मित्र मंडळाच्या वतीने हनुमंत रायाची पूजा आरती व प्रसाद वाटप करून सर्व काशी यात्रेकरूंचं सर्वांचा सन्मान करून सन्मान केला याप्रसंगी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते भाविकांनी हर हर महादेव छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देत अंकुश पाटील व माधव धुमाळ यांचे आभार मानले

# प्रस्तावित व्हायब्रंट पेपर मिलचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द

## भेंडाळा ग्रामस्थांच्या लढ्याला मिळाले यश

**गंगापूर । प्रा.संजय तुपे**

भेंडाळा शिवारातील गट क्रमांक ३८ येथे प्रस्तावित व्हायब्रंट पेपर मिलच्या प्राथमिक कामाला सुरुवात झालेली आहे. पेपर मिलचा प्रकल्प हा गंभीर प्रदूषण करणारा प्रकल्प आहे. असे असतानाही भेंडाळा ग्राम पंचायतीच्या सरपंचाने नागरिकांना विश्वासात न घेता सदर प्रकल्पाला ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केले होते. गावकऱ्यांना याची माहिती मिळताच गावामध्ये याबद्दल प्रचंड असंतोष निर्माण झाला. दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या ग्रामसभेत यावर सविस्तर चर्चा होऊन, 'सदर प्रकल्पाला दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येत आहे' अशा आशयाचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. सदर पेपर मिल मालकाला दिनांक ८ऑक्टोबर २०२४ रोजी पत्र देऊन कळविण्यात आले आहे.भेंडाळा आणि परिसरामध्ये अगोदरच प्रदूषण करणारे अनेक कारखाने कार्यरत आहेत. कारखान्यांच्या प्रदूषणामुळे सभोवतालच्या नागरिकांचे जीवनमान धोक्यात आले आहे. दहा किलोमीटर त्रिजेच्या परिसरातील संपूर्ण भूजल साठा प्रचंड प्रमाणात प्रदूषित झालेला आहे. या प्रदूषणाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार तक्रारी करूनही कारवाई केल्या जात नाही. त्यामुळे प्रदूषण करणाऱ्या नवीन प्रकल्पाला मंजुरी देण्यात येऊ नये असेच येथील नागरिकांचे माननीय आहे. असे असतानाही भेंडाळा येथील ग्रामपंचायतच्या सरपंचाने गावातील नागरिकांना विश्वासात न घेता सदर प्रकल्पाला ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असल्याचे सांगितले जात होते. या निर्णयामुळे लोकांच्या जीवनमानावर व पर्यावरणावर किती विपरीत परिणाम होऊ शकतो याबद्दल अनेक ग्रामस्थांनी आवाज उठवला होता.ग्रामसभेत स्थानिक नागरिकांनी एकत्र येऊन या प्रकरणात स्पष्ट आणि ठोस विरोध दर्शवला. सर्वांच्या सहमतीने ग्रामसभेमध्ये सदर प्रकल्पाला दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

### प्रस्थापित पेपर मिलचा प्रकल्प प्रचंड प्रदूषण करणारा

**प्रस्तावित पेपर मिलचा प्रकल्प हा प्रचंड प्रदूषण करणारा प्रकल्प आहे.असे असतानाही गावकऱ्यांना विश्वासात न घेता सरपंच आणि ग्रामसेवकाने संगनमताने ना हरकत प्रमाणपत्र दिले, हे अत्यंत खेदजनक आहे. ग्रामसेवकांना वारंवार विनंती करूनही त्यांनी सदर पेपर मिल मालकाला ग्रामसभेच्या निर्णयाबद्दल आजपर्यंत कळवलेले नव्हते. या प्रकरणांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करावा आणि संबंधित ग्रामसेवकावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.– ॲड.विक्रम परभणे**

# सिरसदेवीतील एका शेतातील बोअरवर लावलेल्या सौर ऊर्जेच्या नऊ प्लेटा गेल्या चोरीला

**सिरसदेवी । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी गावांनजिक असलेल्या पांडुळ्याची वाडी शिवारात एका शेतकऱ्यांच्या बोअर वरील लावलेल्या सौर ऊर्जेच्या नऊ प्लेटा चोरी गेल्याची घटना दि.०१/०९/२०२४ रोजी घडली असून या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्ती विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सविस्तर माहिती अशी कि,सिरसदेवी येथील रहिवासी विठ्ठल नाना अडागळे वय (५०) या शेतकऱ्याचे शेत पांडुळ्याच्या वाडी येथील गट क्र. ९४ येते शेत आहे. हे शेत वडिलांच्या नावावर असून वडील वयोवृद्ध थकलेले आहेत त्यामुळे विठ्ठल अडागळे हे ती शेती वहिती करत आहेत.विठ्ठल अडागळे यांना पी एम कुसुम योजनेतून सौर ऊर्जेचा पंप मिळाला होता तो शेतातील बोअरवर नऊ प्लेटा बसवल्या होत्या ज्याची किंमत ३२००० हजार किमतीच्या होत्या रोजच्या प्रमाणे विठ्ठल अडागळे सकाळी ८ च्या सुमारास शेती कामासाठी गेले असता त्यांना बोअर वरील सौर ऊर्जेच्या प्लेटा सर्वच्या सर्व नऊ प्लेटा न दिसल्याने त्यांनी आजूबाजूला शोध घेतला परंतु त्या दिसून आल्या नाहीत त्या कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेलेल्या आहेत असा संशय आल्याने त्यांनी तलवाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन अज्ञात चोराच्या विरोधात दि. ०६/०९/२०२४ रोजी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास तलवाडा पोलीस करत आहेत.

# प्रा संजय तुपे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक क्रांती योद्धा पुरस्कार प्रदान

**गंगापूर । प्रतिनिधी**

येथील यांचे शिक्षण क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील योगदान विचारात घेवून महाराष्ट्र नवक्रांती शिक्षक व पदवीधर संघटनेच्या वतीने दरवर्षी सामाजिक क्षेत्र, शिक्षणक्षेत्र, प्राध्यापक, वकील, पोलीस,पत्रकार, यांना दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार दिला जातो यामध्ये गंगापूर येथील सामाजिक कार्यकर्ते,व पत्रकार प्रा संजय तुपे यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला,,हा पुरस्कार सोहळा



अकोला जिल्ह्यातील तेल्हारा येथे आयोजित करण्यात आला होता,याप्रसंगी उद्घाटक अभय दादा पाटील (विधान परिषद सदस्य) महाराष्ट्र नवक्रांति शिक्षक व पदवीधर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा उमेश म्हासाये, राज्याध्यक्षा पद्मावती टीकार, राज्यउपाध्यक्ष प्रा.संजय तुपे,दांडले सर,पाठक सर व राज्यातून आलेले विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.याबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे,पदवीधर आमदार सतीश चव्हाण, आमदार अंबादास दानवे,आमदार प्रा बोरणारे, आमदार प्रशांत बंम्ब,यांनी अभिनंदन केले तसेच जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष दिनेश अंभोरे,नवनाथ बारगळ,दिनेश सावजी,सुनिल मरकड,सरपंच विनोद तुपे,प्राचार्य प्रमोद तुपे राजाभाऊ वायाळ, राम सोलाट, संदेश केरे, सतिश कोळी, गणेश पवार यांच्यासह विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# गावंदरा येथील यशवर्धन कांबळेचे कुस्ती स्पर्धेत यश



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गावंदरा येथील यशवर्धन सुरेश कांबळे याचा परभणी येथे दिनांक १५ अक्टोबर रोजी झालेल्या कुस्ती स्पर्धेत वयोगट १४ वर्ष ५७ किलो वजनी गटात विभागात द्वितीय क्रमांक मिळवला आहे.त्याला कुस्ती कोच म्हणून अनिकेत गोरे तर क्रीडा मार्गदर्शक म्हणून शिक्षक घुले सर लाभले.त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कै.पंडितअण्णा मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त मिलिंद विद्यालयात अभिवादन कार्यक्रम संपन्न

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

दि.१५ ऑक्टोबर २०२४, कै.पंडितराव पांडुरंगराव मुंडे यांच्या ८ व्या पुण्यतिथीनिमित्त मिलिंद माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज येथे मुख्याध्यापक/प्राचार्य श्री.कदरकर सर,श्री.शिंदे सर, पर्यवेक्षक श्री.धायगुडे सर जेष्ठ प्राध्यापक श्री.फड सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास मिलिंद माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी सांस्कृतिक विभागाकडून कै. स्वर्गीय पंडितराव पांडुरंगराव मुंडे यांच्या जीवनकार्यावर संक्षिप्त प्रकाश टाकण्यात आला. उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून कै.पंडितराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



# धारूर तालुक्यात आदर्श शाळा स्पर्धेत खाजगी गटात जिजामाता विद्यालय तेलगाव तर शासकीय गटात जि.प.कन्या शाळा प्रथम

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा–२ मध्ये तालुकास्तरावर शासकीय गटात जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा धारूर तर खाजगी गटात जिजामाता प्राथमिक विद्यालय तेलगाव या शाळेस प्रथम पारितोषिक मिळाले आहे, त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. शिक्षण विभागाचे वतीने राबवण्यात येणारे भारतरत्न रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा –२ मध्ये तालूकास्तरीय निकाल गटशिक्षणाधिकारी यांनी जाहीर केला असुन या मध्ये तालुक्यात जिल्हा परीषद शाळा गटात प्रथम जि प कन्या प्राथमिक शाळा धारूर, द्वितीय जि. प.प्राथमिक शाळा कारी, तृतीय जि. प .प्राथमिक शाळा जैतापुर, चौथी जि प प्राथमिक शाळा असोला तर खाजगी शाळा गटात प्रथम जिजामाता प्राथमिक शाळा तेलगाव, द्वितीय नुतन माध्यमीक विद्यालय अंजनडोह, तृतीय वंसुधरा माध्यमीक विद्यालय कोळपिंप्री, चौथे नाथकृपा माध्यमिक विद्यालय कासारी यांनी मिळवले याबद्दल सर्व शाळाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# आनंद दत्त धाम आश्रम माहूर येथे जिल्हास्तरीय गोल्ला गोलेवार यादव समाजाचा मेळावा संपन्न

**नांदेड | प्रतिनिधी**

माहूर येथे गोल्ला गोलेवार यादव महासंघाच्या वतीने दर वर्षी घेण्यात येणारा गुणवंतांचा गौरव व समाजभूषण पुरस्कार कार्यक्रम आनंद दत्त धाम आश्रम श्रीक्षेत्र माहूर येथे मोठ्या थाटामाटात, हजारो समाज बांधवांच्या उपस्थित संपन्न झाला.

सदर मेळाव्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, नव नियुक्त कर्मचारी अधिकारी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यंदाचा विशेष समाज भूषण पुरस्कार संपूर्ण देशात स्वच्छता अभियान राबवून शांततेचा संदेश देणारे, सर्व समाजांच्या तळागाळातील लोकांपर्यंत जावून समाज प्रबोधन करणारे, आनंद दत्त धाम आश्रम माहूर गड येथे दर रोज अविरत अन्नदान करणारे राष्ट्रसंत सद्गुरू श्री द.भ.प. साईनाथ महाराज वसमतकर, बितनाळकर यांना प्रदान करण्यात आला, तसेच समाजासाठी सेवेचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ समाज सेवकांचा दरवर्षी देण्यात येणारा समाज भूषण पुरस्कार ज्येष्ठ समाज सेवक श्री दिगंबरराव बाबाराव करेवाड कोल्हारी ता. किनवट व ज्येष्ठ समाज सेवक श्री दगडूजी संतोबा काईतवाड रा. बोरगडी ता. हिमायतनगर यांना प्रदान करण्यात आला. व तसेच नायगाव पं.स.चे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी श्री आर.एम.चिकलवाड सरांचा सेवानिवृत्ती निमित्त समाजातर्फे सन्मान करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक श्री देविदासजीं फुलारी यांचे विद्यार्थी व समाज बांधवांसाठी शैक्षणिक व सामाजिक विषयांवर उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले. व तसेच राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज यांनी समाज बांधवांनी एकत्र राहून समाजासाठी निष्ठेने कार्य केले पाहिजे, समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सामाजिक भावना ठेवून समाजासाठी प्रामाणिक काम केले पाहिजे, समाज कार्य करीत असताना राजकीय हेतू ठेवून समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न समाज प्रमुखांनी करू नये. समाजासाठी एकनिष्ठ राहून प्रामाणिक कार्य करणाऱ्या समाज बांधवांना माझा खंबीर पाठींबा कायम राहील, माझा सदैव आशीर्वाद राहील, परंतु समाजासाठी अप्रामाणिक वागून दिशाभूल करणाऱ्यांच्या पाठीशी मी कधीही उभा राहणार नाही, असा सज्जड इशारा देवून राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज यांनी समाजास संबोधित केले.

यावेळी समाज भूषण श्री दिगंबरराव करेवाड यांनी सर्व समाज बांधवानी एकत्र कार्य करावे, समाजाचे गट ताटात विभाजन करू नये अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी उप शिक्षण अधिकारी श्री गजानन आक्कमवाड यांनीही विद्यार्थ्यांना व उपस्थित समाज बांधवांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात, समाजातील व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे व्यसन राहू नये अथवा जडू नये म्हणून गोल्ला गोलेवार यादव महासंघाचे प्रांत अध्यक्ष श्री भुमन्ना आक्केमवाड भोसीकर यांचे हस्ते व्यसन रुपी रावणाचे दहन करून व्यसन मुक्तीचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पी. पी. फांजेवाड हे होते तर प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून जेष्ठ साहित्यिक श्री देविदास फुलारी हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रांत महासचिव श्री एस. टी. गालेवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचलन श्री पी.जी. रूद्रवाड सर व श्री परशूराम आक्कमवाड सर यांनी केले.या कार्यक्रमाच्या नियोजन साठी श्री




भाऊसाहेब पा. हडसनीकर व त्यांची टीम, श्री माधवराव वटपलवाड सर, जिल्हा सचिव श्री अशोकरावं कासराळीकर, श्री देवीदास आक्कमवाड सर, श्री बालाजीराव शेणेवाड सर, जिल्हा कोषाध्यक्ष श्री तुकाराम कैलवाड, जिल्हा कार्याध्यक्ष श्री रमेशराव रामपुरवार, प्रदेश अध्यक्ष युवक महाराष्ट्र राष्ट्रीय यादव महासभा दिल्ली.तथा जिल्हाध्यक्ष युवक अभिषेकजी बकेवाड, श्री विठ्ठलराव जकिलवाड, श्री गोविंदराव भुसलवाड,मुदखेड ता. अध्यक्ष श्री रामजी गवंडेवाड आदींनी परिश्रम घेतले व तसेच गोदावरी जंगीलवाड यांनी सुंदर रांगोळी काढून आपल्या कलेचा आविष्कार सादर केला. यावेळी मार्गदर्शक म्हैशाचे उद्योजक श्री लालुजी यादव श्री जी.एन. सल्लावार, श्री प्रकाशराव करेवाड, श्री आनंदराव गादीलवाड, श्री तुकाराम रामनबैनवाड सर, श्री परबतराव काईतवाड, अर्धापूर ता. अध्यक्ष श्री गंगाधरराव बक्केवाड, हिमायतनगर ता. अध्यक्ष श्री सुभाषराव सिलेवाड, उमरी ता. अध्यक्ष श्री गणेशराव आनेमवाड, भोकर ता. अध्यक्ष श्री संतोष आक्केमवाड, किनवट प. स. चें उपसभापती श्री कपिल करेवाड, ओबीसी ता.अध्यक्ष बाबाराव जरगेवाड,कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटचे संचालक श्री रमेश बोड्डेवाड, श्री श्यामसेठ जक्कलवड, मुख्याध्यापक श्री रमेश राऊलवार सर, श्री देविदास राऊलवार सर, श्री गोविंदराव दुबेवाड शेंबोलीकर, श्री शिवाजीराव बोटेवाड, श्री बाबाराव जरगेवाड,मा.सरपंच दैवन्ना शैनेवाड,श्री व्यंकटराव आक्कमवाड, श्री.नारायण कोरेवाड,श्री.नागोराव मेडेवाड,श्री.साईनाथ निम्मेवाड, प्रकाश सोकलवाड,श्री मारोतराव झंपलवाड, श्री दत्तात्रय जकीलवाड सर, श्री प्रकाशराव नेरलेवाड साहेब,श्री दत्तात्रय जंगिलवाड साहेब, श्री रामदास शिंगेवाड सर, श्री संभाजीराव बल्फेवाड सर,सौ. गिरीजाबाई संभाजीराव बल्फेवाड, सुभेदार श्री विकास बल्फेवाड साहेब, श्री बाबुराव नरन्ना रूद्रवाड सर, सर,प्रा.कार्तिक मुद्देलवार सर, श्री सदाशिव पालदेवाड सर, श्री.परमेश्वर वटपलवाड, श्री.बालाजी वटपलवाड, श्री नागोराव जंगिलवाड, श्री बळीराम बक्केवाड,श्री.रावण गुरुजी चिखलवाड,श्री.गंगाधर सिध्देवाड,श्री गणपती लालमवाड,श्री नामदेव आक्कमवाड,श्री परमेश्वर जकीलवाड, श्री पोतन्ना आक्कमवाड, श्री गोविंद लालमवाड, श्री परसराम बक्केवाड,श्री शंकर आक्कमवाड, श्री गंगाधर आक्कमवाड, सौ.गोदावरीबाई पेंटू रुद्रवाड, सौ. छाया बाई तुकाराम रामनबैनवाड, सौ.लक्ष्मीबाई नागोराव जंगिलवाड, सौ.महानंदाबाई दिगंबर नागधरे, सौ.पंचफुलाबाई गंगाधरराव बक्केवाड,श्री.बाबु करेवाड,श्री.राजेश चिकनेपवाड, श्री.श्रीकांत राहुलवाड, श्री.मधूकर मिरकगुलवाड, पोतन्ना करेवाड, सरपंच श्री.सुधाकर काईतवाड, झडख श्री.दत्ता काईतवाड,श्री. शंकर राहुलवाड,श्री.काशिनाथ घोसलवाड,श्री.अरमन मारोती शैनेवाड, प्राध्यापकश्री.पुंडलिक चितलवाड सर, श्री.पोपुलवाड सर,श्री.जनार्दन कपलवाड,श्री.गणेश घोसलवाड, श्री.सदाशिव घोसलवाड,श्री.साईनाथ आबेपवाड, श्री.प्रभाकर पोटेवाड, श्री अवधूत घोसलवाड, श्री.गंगाधर बासेवाड,श्री.बालाजी म्याकलवाड, श्री.ज्ञानेश्वर काईतवाड,श्री.अशोक येलावनी, नरगी अशेन्ना व समस्त समाज बांधव उपस्थित होते.

# संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे–पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

## एकरूखे गावातील विविध विकासकामांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन व उद्घाटन

**शिर्डी | प्रतिनिधी**

गारपीट, अवकाळी, दुष्काळ अशा विविध संकटाच्या काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने अनुदानाचे वेळोवेळी वितरण केले आहे. यापुढेही संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याची ग्वाही राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. राहाता तालुक्यातील एकरूखे गावातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आण्णासाहेब म्हस्के पाटील, गटविकास अधिकारी जालिंदर पठारे, नायब तहसीलदार हेमंत पाटील, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अभियंता काशीनाथ गुंजाळ, भूमिअभिलेख अधिकारी योगेश थोरात, एकरूखे सरपंच जितेंद्र गाढवे पाटील आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, समाजातील शेवटच्या घटकाला फायदा झाला पाहिजे यासाठी शासन योजना राबवित आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून महिलांना ऑक्टोंबरपर्यंतचे अनुदान वितरित झाले



आहे. यापुढे ही योजना बंद होऊ न देता याऊलट योजनेच्या अनुदानात वाढ केले जाईल. मुख्यमंत्री बळीराजा योजनेतून शेतकऱ्यांचे कृषी वीज बील माफ करण्यात आले आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात १२२ कोटींचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. सोयाबीन अनुदान व दूध अनुदानाचे पैसेही शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहे. मुलींना उच्च व्यावसायिक शिक्षण मोफत करण्यात आले आहे. एसटी भाड्यात महिलांना दिलेल्या पन्नास टक्के सवलतीमुळे तोट्यातील एसटी फायद्यात आली आहे. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन यात्रा योजनेत येत्या १७ तारखेला जिल्ह्यातील ८०० ज्येष्ठ नागरिकांना रेल्वेने अयोध्या यात्रेला पाठविण्यात येणार आहे, असेही पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. शिर्डी एमआयडीसीत डिफेन्स कलस्टरच्या माध्यमातून एक हजार कोटींची गुंतवणूक तसेच येत्या काळात २४ औद्योगिक प्रकल्प याठिकाणी येणार आहेत. शिर्डीत 'साईबाबा थीम पार्क' साकार होणार आहे. शिर्डी विमानतळाचे विस्तारिकरण होत आहे. अशा विविध कामांमुळे राहाता तालुक्यातील १० हजार तरूणांना नवीन रोजगार उपलब्ध होणार आहे.,असेही पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी सांगितले. आण्णासाहेब म्हस्के पाटील, जितेंद्र गाढवे पाटील यांची यावेळी भाषणे झाली.जिल्ह्याचे 'अहिल्यानगर' नामांतराचा ऐतिहासिक निर्णय, एक रूपयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या माध्यमातून एकरूखे गावातील शेतकऱ्यांना २ कोटी ९७ लाखांचे अनुदान व शिर्डी येथे एमआयडीसी उपलब्ध करून दिल्याबद्दल एकरूखे गावांतील सर्व समाजबांधव, ग्रामस्थ व शेतकरी यांच्यावतीने पालकमंत्र्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात पाच महिला बचतगटांतील प्रत्येकी एका महिलेस फुड प्रोसेसिंग युनिटचे वाटप करण्यात आले. पालकमंत्र्यांच्या हस्ते एकरूखे गावातील ८ कोटी ४२ लाखांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन करण्यात आले. यात अहिल्यानगर जिल्हा परिषद, संगमनेर सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रादेशिक पर्यटन विकास सन २०२३-२४ व 'क' वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजना सन २०२३-२४ व २०२४-२५ अंतर्गत एकरूखे येथील वज्रेश्वरी माता मंदिर परिसर सुशोभीकरण कामांचा समावेश आहे.प्रास्ताविक देवेंद्र फवर यांनी केले.

# पुणे शहरासाठी १ हजार नव्या ई–बसचा प्रस्ताव

**पुणे (वृत्तसंस्था)**

पुणे शहरात मेट्रोचं जाळं विस्तारत असताना पीएमपीएमएलचं सक्षमीकरण करण्यावर आपला भर असून पीएमपीएमएलसाठी मोदी सरकारच्या माध्यमातून १ हजार नव्या ई-बस मिळाव्यात, या संदर्भातील प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एचडी कुमारस्वामी यांना दिला. शिवाय या प्रस्तावासंदर्भात पुणे शहरातील बसेसची आताची संख्या, आवश्यकता आणि भविष्यातील गरज, यासंदर्भात चर्चा केली. यावर मंत्री यांनी आपल्या प्रस्तावावर कार्यवाही आणि प्रक्रिया करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना दिले आहेत अशी महिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. मोहोळ म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार २०१४ साली देशात आल्यापासून पुणे शहराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास व्हायला सुरुवात झाली. सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी पुणे मेट्रोची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यानंतर वनाज ते रामवाडी आणि पीसीएमसी ते स्वारगेट हे ३३ किलोमीटरचे दोन मार्ग १०० टक्के कार्यान्वित करत हिंजवडी-शिवाजीनगर या मेट्रोच्या कामाचाही शुभारंभ केला. तसेच नुकतेच स्वारगेट-कात्रज या भूमिगत मार्गाचे भूमिपूजन झाले असून खडकवासला ते खराडी आणि नळस्टॉप ते माणिकबाग या दोन टप्प्यांना राज्य सरकारने मंजुरी दिली आहे.एकीकडे मेट्रोचे जाळे विस्तारत असताना दुसरीकडे पीएमपीएमएलचे सक्षमीकरणही मोदी सरकारच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहे. याचाच भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर पुणे शहराला मोदी सरकारच्या माध्यमातून ई-बसेस प्राप्त झाल्या. आजवर ४५० हून अधिक ई-बसेस मोदी सरकारच्या माध्यमातून पुणे शहराला मिळाल्या आहेत.मेट्रोचे जाळे भक्कम होत असताना पीएमपीएमएलच्या बसेसची संख्या वाढावी आणि पुणेकरांना सार्वजनिक वाहतुकीच्या सोयी सहज, सुलभ आणि वेळेत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नव्या १ हजार ई-बसेसचा प्रस्ताव दिला आहे. मला विश्वास आहे, या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही होऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

# संगमनेर महाविद्यालयात हिरालाल पगडाल लिखित 'इलेक्शन विलेक्शन'पुस्तकाचे विद्यार्थ्यांना वितरण

## सामान्य माणसेच असामान्य कार्ये उभारतात:श्री.चं.का देशमुख

**संगमनेर | प्रतिनिधी**

जबाबदार समाज घडवायचा असेल तर विद्यार्थ्यांवर समाजसेवेचा संस्कार केला पाहिजे.मी- माझ्याच्या पलीकडे जावून आपला समाज ही भावना त्यांच्यामध्ये रुजविली पाहिजे. रोजच्या जीवनातील छोट्या छोट्या गोष्टीदेखील मोठा परिणाम घडवून आणतात.कारण सामान्य माणसेच असामान्य कार्य करून इतिहास घडवित असतात, असे मत श्री. चं.का देशमुख यांनी मांडले. श्री.संत गाडगेबाबा भानू प्रभाकार सेवा प्रतिष्ठान आणि संगमनेर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुस्तक वितरण कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.याप्रसंगी व्यासपीठावर संगमनेर महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड, माजी प्राचार्य डॉ. के के. देशमुख, डॉ.एस. बी.मालवाडकर, माजी प्राचार्य भुजबळ , संगमनेर नगर परिषदेचे माजी प्रशासक श्रीनिवास पगडाल, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रो.डॉ. सुवर्णा बेनके आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.सदर कार्यक्रमात राज्यशास्त्र विभागातील सुमारे ६० विद्यार्थ्यांना हिरालाल पगडाल लिखित 'इलेक्शन विलेक्शन' या पुस्तकाचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. के.के देशमुख, डॉ..एसडी. मालवाडकर यांनी आपल्या मनोगतामध्ये संगमनेर महाविद्यालयाच्या






गौरवशाली परंपरेचा आणि सामाजिक कार्याचा उपस्थित विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. तसेच आपल्या कार्यकाळातील आठवणींना उजाळा दिला.अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण गायकवाड यांनी विद्यार्थीदशेतील वाचन संस्काराचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.सुजाण नागरिक म्हणून घडण्यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी आजूबाजू घडणाऱ्या घटनांकडे चिकित्सक दृष्टीने बघितले पाहिजे,विविध लेखकांची पुस्तके वाचली पाहिजेत.त्यातूनच वैचारिक जडण घडण होत असते.सदर पुस्तक वितरणासारखे विधायक उपक्रम विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यामध्ये आणि त्यांना वाचनाची गोडी निर्माण करण्यामध्ये महत्त्वाचे योगदान देतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी प्राचार्य डॉ. देशमुख, डॉ. मालवाडकर आणि श्री.चं. का देशमुख यांनी श्री संत गाडगेबाबा भानू प्रभाकार सेवा प्रतिष्ठानच्या समाजोपयोगी कार्यासाठी निधी म्हणून प्रत्येकी १०,०००.रुपयांचा धनादेश प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला. या कार्यक्रमाचे .प्रास्ताविक.प्राचार्य भुजबळ यांनी तर आभार प्रो. डॉ. सुवर्णा बेनके यांनी मानले.सूत्रसंचालन डॉ. हनुमंत कुरकुटे यांनी केले .सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राज्यशास्त्र विभागातील डॉ. श्रीनिवास भोंग , डॉ.वसंत खरात आणि प्रा.सुजाता शिरोडे यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्योगाकांनी रोजगारासाठी स्थानिकांना प्राधान्य द्यावे-उद्योगमंत्री उदय सामंत

# एमआयडीसीमुळे शिर्डी औद्योगिक हब म्हणून नावारूपाला येईल-राधाकृष्ण विखे पाटील

### शिर्डी औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) व डिफेन्स क्लस्टरचे भूमिपूजन

**शिर्डी । प्रतिनिधी**

एमआयडीसी व डिफेन्स क्लस्टरमुळे शिर्डी व परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार आहे, उद्योजकांनी स्थानिक युवकांना रोजगारासाठी प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज येथे व्यक्त केली.

सावळी विहीर येथे शिर्डी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) औद्योगिक वसाहतीचे व डिफेन्स क्लस्टरचे भूमिपूजन उद्योगमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, अहिल्या नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आण्णासाहेब म्हस्के पाटील, शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, निबे लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे आदी उपस्थित होते.

उद्योगमंत्री म्हणाले, येत्या काळात राज्यात पाच ठिकाणी डिफेन्स क्लस्टर सुरू करण्यात येणार आहेत. यातील एक डिफेन्स क्लस्टर शिर्डी औद्योगिक वसाहतीत सुरू करण्यात येत आहे. या डिफेन्स कलस्टरच्या माध्यमातून १ हजार २०० कोटींची गुंतवणूक होणार आहे. येत्या काळात शिर्डी बरोबर कोपरगाव शहरातही औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. राज्य शासनाचे धोरण उद्योगस्नेही आहे. महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक वाढत आहे. रत्नागिरी जिल्ह्यात ३० हजार कोटींचा सेमी कंडक्टर प्रकल्प सुरू होत आहे. यात ८० टक्के स्थानिक तरूणांना परदेशात प्रशिक्षण देऊन या प्रकल्पात कायम नोकरी दिली जाणार असल्याचे उद्योगमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

श्री.विखे पाटील म्हणाले, एमआयडीसी शिर्डी व परिसरातील युवकांसाठी नवा आशेचा किरण आहे. या माध्यमातून हजारो तरूणांना कायमस्वरूपी रोजगार मिळणार आहे. कोपरगावात एमआयडीसी उभारण्यासाठी शेती महामंडळाची ३०० एकर जागा विनाशूल्क उपलब्ध करून दिली जाईल, असे त्यांनी सांगितले.

शिर्डी एमआयडीसीमुळे शिर्डी, राहाता, कोपरगाव या परिसरातील स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. शिर्डी श्री साईबांबा देवस्थान म्हणून जगभर ओळखले जाते. यापुढे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग येणार असल्याने एक 'औद्योगिक हब' म्हणून उदयास येईल, असा विश्वासही पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार आशुतोष काळे यांचेही यावेळी भाषण झाले. प्रास्ताविक गणेश निबे यांनी केले.

अशी साकारणार शिर्डी एम.आय.डी.सी : - सावळीविहीर (ता.राहाता) येथील शेती महामंडळाच्या ५०२ एकर जागेवर शिर्डी एमआयडीसी साकारणार आहे. राहाता तालुक्यातील सावळीविहीर बु. व सावळीविहीर खु. तसेच कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे या गावांच्या क्षेत्रात एमआयडीसीची जागा आहे. शासनाच्या जमिनीवर भूसंपादनाविना विकसित करण्यात येणारी ही राज्यातील पहिलीच एमआयडीसी ठरणार आहे. रस्ते आणि वीज विकासासाठी १०० कोटी रुपयांची मान्यता यापूर्वीच देण्यात आली आहे. शिर्डी औद्योगिक वसाहतीचे हे ठिकाण शिर्डी शहरापासून ५ किलोमीटर, समृद्ध महामार्गाच्या इंटरचेंजपासून केवळ ३ किलोमीटर व साईबाबा (शिर्डी) आंतरराष्ट्रीय विमानतळापासून १४ किलोमीटर अंतरावर आहे. रेल्वेमार्ग, रस्तेमार्ग तसेच हवाईमार्गाने देशभरातील सर्व प्रमुख शहरांना अत्यंत सुलभतेने जोडणारी औद्योगिक वसाहत म्हणूनच भविष्यात उद्योजकांकडून चांगला प्रतिसाद अपेक्षित असल्याचे एमआयडीसी प्रशासनाचे म्हणणे आहे. डिफेन्स क्लस्टरचे वैशिष्ट्य :- शिर्डी एमआयडीसीत आज डिफेन्स क्लस्टरचे भूमिपूजन करण्यात आले. एमआयडीसीच्या २०० एकर जागेत हे क्लस्टर साकार होणार आहे. पुणे स्थित निबे लिमिटेड ही संरक्षण सामग्रीची निर्मिती करणारी कंपनी या क्लस्टरमध्ये पहिला कारखाना उभारणार आहे. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे हे राहाता तालुक्यातील भूमिपुत्र आहेत. यामाध्यमातून एक हजार कोटींची गुंतवणूक होणार असून या क्लस्टरमध्ये शिर्डी व परिसरातील २ हजार तरूणांना थेट नवीन रोजगार उपलब्ध होणार आहे.



## १० वर्षात उमेदवारीत चूक, विकासाचा बॅकलॉग पूर्ण:माजी आ.राजन पाटील यांची स्पष्टोक्ती



**मोहोळ (वृत्तसंस्था)**–मागील दहा वर्षात चुकीचा उमेदवार दिल्यामुळे मोहोळ विधानसभा मतदारसंघात म्हणावा तसा विकास झाला नसल्याची कबुली देत, मागील दहा वर्षांचा विकास कामांचा बॅकलॉग या साडेचार वर्षात आमदार यशवंत माने यांनी भरून काढल्याचे सांगत माजी आमदार राजन पाटील यांनी विरोधकांवर जोरदार शब्दिक हल्ला चढवला.

टाकळी सिकंदर(ता.मोहोळ) येथे तिऱ्हे मार्ग कुरूल ते पंढरपूर या मंजूर रस्त्याचे भूमिपूजन माजी आमदार राजन पाटील यांच्या हस्ते झाले. सुमारे २७१ कोटी २० लाख रुपयांचा निधी या कामासाठी मंजूर आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भीमा साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन कल्याणराव पाटील होते. राजन पाटील यांनी विकासाच्या मुद्यावर राजकारण करणा–या विरोधकांचा भाषणातून खरपूस समाचार घेतला. यावेळी किसन जाधव, हरिदास बंडगर, राजाभाऊ आढेगावकर, अंगद भुसे, सिद्धू गायकवाड यांच्यासह कुरुल, टाकळी सिकंदर येथील नागरिक उपस्थित होते.

शेतक–यांच्या भल्यासाठी अनगर अप्पर तहसील अप्पर तहसील कार्यालय हे शेतकऱ्यांच्या भल्यासाठी स्थापन केले. विरोधकांनी जनतेची दिशाभूल केली. अनगरचाच फक्त विकास करायचा असता तर हा तिऱ्हे रोड सिमेंट कॉंक्रीट रस्ता अनगरला नेला नसता का? असा सवाल केला. जिथे ज्या कामाची आवश्यकता तिथे विकासकामे करण्याचे काम आम्ही केले. विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडू नका, असे राजन पाटील म्हणाले. यावेळी कल्याणराव पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील १७ गावे यशवंत माने यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

## सायबर धोके, फिशिंग, हॅकिंगबाबत केली जागृती:कुरुलच्या न्यू इंग्लिशस्कूलमध्ये मार्गदर्शन

**कुरुल (वृत्तसंस्था)**–सायबर सुरक्षेच्या तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना विविध सायबर धोके कसे ओळखावे? पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडिया वापरताना घ्यायची काळजी? फिशिंग आणि हॅकिंगसारख्या धोरणांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. याबरोबरच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. कुरुल (ता. मोहोळ) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सायबर सुरक्षा या विषयावर एक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल क्विक हिल फाउंडेशन यांच्या विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबवण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये इंटरनेट वापराच्या सुरक्षित पद्धती, ऑनलाइन धोके, तसेच त्यांच्यापासून संरक्षण कसे करावे? याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोजन केले होते. तृप्ती पवार व तेजश्री पवार यांनी विद्यार्थ्यांना इंटरनेटच्या जबाबदारीने वापराचे महत्त्व पटवून देत सायबर सुरक्षेचे नियम पाळण्याचे आवाहन केले. आधुनिक काळात इंटरनेट वापर अटळ आहे. परंतु त्या सोबत येणारे धोके ओळखून सुरक्षित राहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग व पालकांचीही मोठी उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची शपथ देण्यात आली. मुख्याध्यापक जे. पी. मदने यांनी मार्गदर्शन केले.



## श्री कालिका देवी मंदिरात रंगला सोहळा:नऊ दिवस युवती, महिलांनी साकारली नवदुर्गेची रुपे, कासार समाजाच्या वतीने नवरात्र महोत्सव

**पंढरपूर (वृत्तसंस्था)**–येथील सोमवंशीय क्षत्रिय कासार समाजाच्यावतीने श्री. कालिका देवी मंदिरात नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या नवराञोत्सवात दररोज श्रीसूक्त पठण,रांगोळी स्पर्धा,लहान मुलांच्या गेम,संगीत खुर्ची,महिलांचा नवदुर्गा कार्यक्रम,खेळ रंगला पैठणीचा व दांडीया अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



घटस्थापनेपासून सुरु झालेल्या नऊ दिवसांच्या या सोहळ्यात कासार समाजातील आबालवृध्द सहभागी झाले होते. रोज लहान मुले, महिलांसाठी विविध स्पर्धा आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले.

नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या नवदुर्गा कार्यक्रमात साक्षी वाडेकर, देवकी सासवडे, प्राची मंगरूळे,पल्लवी कोकीळ, प्रियंका गाडे,स्नेहल गाडे, श्रध्दा वेळापूरे,राधा मोहोळकर, प्रतिक्षा येवनकर यांनी नवदुर्गेची विविध रूपे साकार केली.तसेच समाजातील महिलांसाठी खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रथम क्रमांक पैठणी शितल होरणे,व्दितीय सोन्याची नथ प्रतिक्षा येवनकर व तृतीय भेट वस्तू प्रियंका येवनकर हे विजेते ठरले.बक्षिसांचे प्रायोजक संस्थेचे चेअरमन अभय भिवरे व अध्यक्ष विजय मोहोळकर, अमित मंगल हे होते, त्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. सर्व कार्यक्रमांमध्ये कालिका युवा परिवाराचे अक्षय वाडेकर,ऋषिकेश रोकडे,हर्षल तिवाटणे,मुकुंदा रोकडे,ओंकार मांगले यांच्यासह समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

# २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात निवडणूक,२३ नोव्हेंबरला मतमोजणी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

निवडणूक आयोगाने आज महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी महाराष्ट्रात एकाच टप्प्यात मतदान होणार असल्याचे जाहीर केले. त्यानुसार २० नोव्हेंबरला राज्यात मतदान होणार असून, २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

निवडणूक आयोगाने यावेळी महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांसह ४८ विधानसभा आणि २ लोकसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीच्या तारखाही जाहीर केल्या.

महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात आणि झारखंडमध्ये दोन टप्प्यात निवडणुका होणार आहेत. पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला आणि दुसऱ्या टप्प्यात २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे.

विधानसभेच्या ४८ आणि लोकसभेच्या २ जागांसाठी पोटनिवडणूकही दोन टप्प्यात होणार आहे. १३ नोव्हेंबरला विधानसभेच्या ४७ आणि लोकसभेच्या एका जागेसाठी मतदान होणार आहे. एक विधानसभा आणि एका लोकसभेच्या जागेसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. २३ नोव्हेंबरला निकालही लागणार आहे.

महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला, तर झारखंड विधानसभेचा कार्यकाळ ५ जानेवारी २०२५ रोजी संपत आहे.

अशी असेल महाराष्ट्रातील निवडणुकीची प्रक्रिया

२३ ते २९ ऑक्टोबर दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार

३० ऑक्टोबर उमेदवार अर्जाची छाननी

४ नोव्हेंबरला अर्ज मागे घेता येणार

२० नोव्हेंबरला राज्यात मतदान

२३ नोव्हेंबरला मतमोजणी



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077